# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे बांधण्यात येणाऱ्या शासकीय इमारतींकरिता स्थापत्य आणि विद्युत या दोन्ही कामांसाठी एकच निविदा काढल्याबाबत**

**(१) ९४ (२०-०३-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे बांधण्यात येणाऱ्या शासकीय इमारतींकरिता शासनाच्या नविन निर्णयाप्रमाणे स्थापत्य आणि विद्युत या दोन्ही कामांसाठी एकच निविदा काढली जाणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नविन निर्णयामुळे बेरोजगारांना कामे मिळविताना अडचणी उद्भवणार असून वीज अभियंत्यांचा रोजगार धोक्यात आल्याने वीज अभियांत्रिकीची पदवी घेऊनही नोकरी न मिळाल्याने राज्यातील हजारो युवकांनी नोंदणी करुन कंत्राटदारीला सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र अर्थात फेकाम या राज्यातील विविध विभागातील ३६ जिल्हा विद्युत कंत्राटदार शिखर संघटनेने उक्त शासन निर्णय रद्द करुन विज संच मांडणी, फायर फायटींग लिफ्ट यांच्या निविदा वेगवेगळ्या काढण्यात याव्यात तसेच विद्युत विभागासाठी योग्य परिपत्रके देखील

वेगळी काढण्यात यावीत अशा प्रमुख मागण्या केल्या असून सदर निर्णय रद्द न केल्यास महावितरणासह विविध क्षेत्रातील कामे बंद पाडण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०८-२०२०) :** (१) खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे. (शासन निर्णय रद्द करण्याबाबत मागणी केली आहे).
(४) स्थापत्य व विद्युत कामांकरीता रु.३ कोटी पर्यंतच्या स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत सुधारीत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंत्रालय ते विधान भवन या ३८० मीटर लांबीच्या सब-वे च्या कामाबाबत**

**(२) ११९ (१६-०३-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालय, विधान भवन आणि नवीन प्रशासकीय इमारत यांना मेट्रो रेल्वे स्थानकाशी जोडणारा भूमिगत मार्ग (सब-वे) बांधण्याचा प्रस्ताव मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालय व विधान भवन या ३८० मीटर लांबीच्या सब वेच्या कामासाठी मुंबई मेट्रो रेल महामंडळाने (एमएमआरसीएल) २ कोटी रुपये खर्चास मान्यता माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान दिली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या सब-वेच्या सुरक्षेची काळजी घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याने समाधानकारक अहवाल दिल्यानंतर सब-वेच्या बांधकामास गृह खात्याने मंजुरी दिली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सब-वेचे काम आता रुपये २ कोटी खर्चावरुन रुपये ९९ कोटीवर पोहोचले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या खर्च प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व सदर खर्च वाढण्याची कारणे काय आहेत तसेच सदर सब-वे चे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रस्तावास राज्य शासनाने माहे जून, २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

(२) मंत्रालय ते नवीन प्रशासकीय इमारत ते विधान भवन ते नियोजित विधानभवन मेट्रो रेल स्थानकापर्यंत ३८० मीटर भुयारी मार्ग बांधणे व मंत्रालय गार्डन भागात भूमिगत दुमजली वाहनतळ, नवीन कार्यालयीन इमारतीचे बांधकाम व इतर अनुषंगिक सुरक्षा कामे करणे इत्यादी बाबींचा समावेश असलेल्या योजनेस माहे जून, २०१९ मध्ये रु.४००.०० कोटी इतक्या किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली आहे.

(३) हे खरे नाही

प्रशासकीय मान्यतेमध्ये भुयारी प्रवासी मार्गासह सुरक्षा यंत्रणेचाही समावेश आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

प्रवासी भुयारी मार्गाचे बांधकाम सुरक्षा यंत्रणेसह मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि., मुंबई यांच्यामार्फत करण्यात येणार असून सद्य:स्थितीत मंत्रालय परिसरातील १०४, नवीन प्रशासकीय इमरतीच्या वाहनतळ परिसरातील ६४ पाईल्सचे काम पूर्ण करण्यात आले असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## मुंबई-पुणे द्रूतगती महामार्गावरील खालापूर टोल नाक्याजवळील स्वच्छतागृह बंद केले असल्याबाबत

**(३) १५६ (२१-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रूतगती महामार्गावरील खालापूर टोल नाक्याजवळील स्वच्छतागृह एमएसआरडीसी विभागाने बंद केल्यामुळे नागरिकांना व विशेषत: महिलांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावरील प्रवासात विश्रांती व नैसर्गिक विधीसाठी ४० कि.मी. अंतरावर स्वच्छतागृह हा शासनाचा नियम असताना खालापूर टोल नाक्यावरील सुस्थितीत असणारे स्वच्छतागृह अचानक बंद केल्यामुळे पुरूष व महिलांना उघड्यावरच नैसर्गिक विधी करावा लागत असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून स्वच्छतागृह बंद करून शासनाच्या स्वच्छता मोहिमेचा अवमान करणा-या संबंधीत विभागाच्या अधिका-यांवर कारवाई तसेच स्वच्छतागृह तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खालापूर टोल नाका येथील स्वच्छतागृह दुरुस्तीसाठी तात्पूरते बंद करण्यात आले होते. सध्या स्वच्छतागृह वापरात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांना व इतर जिल्हा मार्गांना दर्जोन्नत करून प्रमुख जिल्हा मार्ग करण्याबाबत

**(४) ५१६ (२१-०३-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, नागभीड, ब्रम्हपुरी व अन्य तालुक्याच्या ग्रामीण रस्त्यांना व इतर जिल्हा मार्गांना प्रमुख जिल्हा मार्ग करून विकसित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रव्यवहार अन्वये सुचविलेल्या रस्त्यांना जिल्हा परिषद ठरावाच्या माध्यमातून दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचेकडे कार्यवाहीस पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्रव्यवहार अन्वये सुचविलेल्या रस्त्यांपैकी अड्याळ हत्तीलेन्ढा दुधवाही राम खेडकहाली खंडाला नान्होरी दिघोरी तपाळ या रस्त्यांना प्रस्तावित करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत उपाययोजना न केल्यामुळे ग्रामीण भागातील लहान रस्त्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने पर्यायी प्रभावी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, सदर पत्रव्यवहारान्वये सुचविलेल्या व प्रस्तावित रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्ग म्हणुन दर्जोन्नत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१७-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) हे खरे नाही.

शा.नि., सा.बां.वि. क्र.रवियो- २०२०/ प्र.क्र.१४/ नियोजन-२, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० अन्वये सदर रस्त्यास दर्जोन्नती देण्यात आली आहे.

(४) सदर रस्ते दर्जोन्नत करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले असून त्यावर नियमानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) सदर रस्त्याबाबत दर्जोन्नतीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) भाष्य नाही.

---

**विदर्भातील नागपूर येथील मिहान प्रकल्पातील ७६ पैकी केवळ १९ कंपन्याच सुरु असल्याबाबत**

**(५) ५२९ (२०-०३-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील नागपूर येथील सन २००२ पासून सुरु असलेल्या मिहान प्रकल्पातील ७६ पैकी केवळ १९ कंपन्याच सुरु असून उर्वरित प्रकल्पांच्या कामांची अद्यापही सुरुवात झाली नसल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मिहान प्रकल्प गत १७ वर्षापासून नागपूर येथे सुरु असताना, त्यातील सुमारे ४१ प्रकल्पांची कामे अद्याप सुरु न होण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच, नॉनसेझ क्षेत्रात एकूण ४१ कंपन्यांनी गुंतवणूक केली असून, त्यातील फक्त आठ कंपन्या सुरु असून, १२ कंपन्यांचे निर्माण कार्य सुरु आहे, तर ११ कंपन्या सध्या कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मिहान प्रकल्पातील जास्तीत जास्त कंपन्या कार्यरत करण्याच्या दृष्टीने अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कधीपर्यंत सदरहू प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१०-०८-२०२०) :** (१) महाराष्ट्र विमानतळ विकास कं. च्या अंतर्गत मिहान प्रकल्पातील विशेष आर्थिक क्षेत्रात एकुण ७७ कंपन्यांना भूखंड आवंटीत करण्यात आले असून, यापैकी सद्यस्थितीत २२ कंपन्यांनी त्यांचे उत्पादन सुरु केले आहे.

(२) मिहान प्रकल्पास गती मिळण्याच्या वेळेस जागतिक स्तरावर आर्थिक मंदी निर्माण झाल्यामुळे अनेक प्रमुख कंपन्यांना त्यांच्या प्रकल्पात गुंतवणूक करतांना अडचणी आल्या. बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र असल्यामुळे निर्यातक्षम उद्योग मिहान प्रकल्पात यावेत अशी अपेक्षा होती आणि त्यानुसार जाहिरात करण्यात आली, परंतु माहिती तंत्रज्ञान व विमानचालन क्षेत्राव्यतिरिक्त इतर उद्योगांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

(३) मिहान प्रकल्पातील विशेष आर्थिक क्षेत्राबाहेर ४२ कंपन्यांना जागा आवंटीत करण्यात आलेली असून यापैकी १३ कंपन्यांनी त्यांचे कामकाज/उद्योग सुरु केलेले आहे तर १२ कंपन्याचे बांधकाम सुरु असून १० कंपन्याना नुकतेच भूखंड आवंटित करण्यात आले आहेत.

(४) मिहान प्रकल्पाचे विकासाचे दृष्टीने विविध ठिकाणी आणि स्तरावर कार्यशाळा व प्रदर्शनी आयोजित करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगांना आमंत्रित करण्यात येत आहे तसेच मिहान प्रकल्पाच्या प्रसिध्दीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

ज्या उद्योगांनी भूखंड आवंटन झाल्यानंतर उद्योग स्थापन केलेले नाहीत त्यांच्याशी विविध स्तरावर प्रत्यक्ष चर्चा करुन, त्यांच्या अडचणी समजवून घेऊन, त्यांना सकारात्मक दृष्टया प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती शहरातील चांदूर रेल्वे रोड बंध विद्यालय ते वडाळी नाका या रस्त्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(६) ५६८ (१६-०३-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अमरावती शहरातील रस्ते सिमेंट कॉंक्रीटीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात सुरु असुन वडाळीतून जाणा-या राज्य महामार्गाचे चांदूर रेल्वे रोड बंध विद्यालय ते वडाळी नाका या अंदाजे दिड किमी रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्त्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित विभागाचे शासकीय अभियंते दुर्लक्ष करीत असून सदरहू काम सुरु असतांना संबंधित शासकीय अभियंते उपस्थित राहत नसल्याने या कामात अपहार होत असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होऊन याबाबत त्वरीत कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे लक्षात घेता शासनाने सदरील राज्य महामार्गाच्या कामात अनियमितता व दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) या कामाबाबत दि. १४.११.२०१९ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.

सदर काम अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ अमरावती यांनी तपासले असून कामाचा दर्जा विहित विनिर्देशाप्रमाणे आहे. काम समाधारकारक आहे.

(२) हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत सुरु असलेल्या विषयांकित कामाचे देखभाल करण्यासाठी शासनाने स्वतंत्र अभियंता (AICONS Engineering Pvt. Ltd. Real Strength Infrastructure J.V.) यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांचेकडून सदरहु कामाची तपासणी झालेली आहे. तसेच शासकीय अभियंत्याव्दारे देखील सदरहु कामाची वेळोवेळी तपासणी करण्यात आलेली आहे.

(३) व (४) कामाचा दर्जा समाधानकारक असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई आणि मुंबईला जोडणाऱ्या वाशी खाडीवर**
**तिसरा पुल उभारण्याबाबत**

**(७) ६७२ (१८-०३-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत उभ्या राहणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे तसेच पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरकडे जाणारी वाहतूक सुरळीत व्हावी याकरिता वाशी खाडीवर तिसरा खाडीपूल बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिसरा खाडीपूल उभारण्याच्या कामाची निविदा काढण्यात आली आहे काय व खाडीपूल उभारण्यास अंदाजे किती निधीची आवश्यकता आहे व कधीपर्यंत खाडीपुलाचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, त्यानुसार वाशी खाडीवर तिसरा खाडीपूल बांधण्याबाबत अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) निविदा प्राप्त झाल्या असून निम्मतम निविदाकार कंत्राटदारास निविदा स्विकृती पत्र देण्यात आले आहे. सदर पुलाची मंजुर अंदाजित प्रकल्प किंमत रु. ७७५.५८ कोटी इतकी आहे. बांधकामाचा कालावधी ३ वर्षे इतका आहे.

(३) कंत्राटदारास निविदा स्विकृती पत्र दिले आहे. शासनातर्फे सदर प्रकल्पबाधीत तिवराची झाडे इ. साठीची पर्यायी जमीन संबंधित वन विभागाचे नावे करुन दिल्यानंतर (वन विभागाची बांधकाम परवानगीसह)प्रकल्प बांधकामास सुरुवात होईल. सदर मंजुरी अंतीम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड-बीदर मार्गावरील उदगीर ते अहमदपूर राज्य मार्गाची झालेली दुरवस्था**

**(८) ७६० (२०-०३-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-बीदर मार्गावरील उदगीर ते अहमदपूर राज्य मार्गाची दूरवस्था झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत त्यामुळे त्या रस्त्यावरुन जाताना वाहन चालकांना व नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उदगीर ते अहमदपूर या मार्गावर सातत्याने वाहनांची वर्दळ असते, या मार्गावरील वाढवणा, पाटी, सुकणी, एकुर्का रोड, इस्लामपूर व गंडीपाटी या गावाजवळील रस्त्यावर ही मोठमोठे खड्डे पडल्याने तेथील वाहनधारकांची व नागरिकांची गैरसोय होत असून रस्त्यावर अनेकवेळा अपघातही झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरचे रस्ते चांगले दर्जेदार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

माहे नोव्हेंबर,२०१९ च्या परतीच्या पावसात प्रश्नाधीन रस्त्याचा भाग क्षतिग्रस्त झाला होता. तथापि, सदर रस्त्याचे नुतनीकरण पूर्ण करण्यात आले आहे. तसेच वार्षिक देखभाल व दुरुस्ती, रस्ते विशेष दुरुस्ती तथा अर्थसंकल्पीय मंजूर कार्यक्रमांतर्गत खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. पोलीस स्थानकाचे अहवालानुसार वाहनचालकाचे निष्काळजीपणामुळे अपघात झाल्याची नोंद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुद्रे भागात असलेल्या 'गुलमोहर' या शासकीय विश्रामगृहाच्या दुरुस्तीच्या कामकाजाबाबत**

**(९) ८१३ (२१-०३-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुद्रे भागात असलेल्या 'गुलमोहर' या शासकीय विश्रामगृहाचे गत सहा वर्षापासून दुरुस्तीचे काम सुरु असून धोकादायक बनलेल्या या विश्रामगृहाच्या दुरुस्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखो रुपये खर्च केले आहेत व गत दोन वर्षापासून विश्रामगृहाचा वापर पूर्णपणे बंद असल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विश्रामगृहाच्या दुरुस्तीचे काम सातत्याने होत असल्यामुळे या दुरुस्तीच्या खर्चातून नवीन इमारत उभी राहिली असती अशी प्रतिक्रिया नागरिकांमध्ये सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
अहमदनगर जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यात "गुलमोहर" या नावाचे कोणतेही शासकीय विश्रामगृह नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात राबविण्यात येणा-या फास्टॅग टोलवसुलीबाबत**

**(१०) ९०५ (२०-०३-२०२०). अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात टोल वसुलीमध्ये पारदर्शकता यावी व वाहनधारकांच्या वेळेची बचत व्हावी या उद्देशाने शासनाने दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी पासून फास्टॅगच्या माध्यमातून टोल वसुली सुरु करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्यावर फास्टॅग असलेल्या वाहनांना टोल भरणा करण्यात तांत्रिक अडचणी येत असून अनेक वाहनधारकांची दुहेरी वसुली होत असल्याच्या तक्रारी आढळून आल्या आहेत तसेच अनेक टोल नाक्यावर गतिमान इंटरनेट सेवा मिळत नाही त्यामुळे फास्टॅगचे स्कॅनिंग आणि बँक क्लिअरन्स लवकर मिळत नाही व टोल रक्कम वसुलीचा ऑनलाईन संदेश येत नसल्याने अनेक वाहनधारकांकडून टोल कंपनी रोखीने रक्कम वसूल करतात, तर काहींच्या फास्टॅग खात्यातून जादा टोलवसूली होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेवर सायबर हल्ले होत असून सायबर हॅकर्सनी ही फास्टॅग टोलयंत्रणा हॅक करून वाहनधारकांच्या खात्यातील मोठमोठ्या रक्कमा परस्पर हडप करायला सुरुवात केल्याच्या घटना घडत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फास्टॅगच्या सुविधेमधील अनेक त्रुटींमुळे तसेच टोल नाक्यावर एक किंवा दोन मार्गिकाच फास्टॅग वाहनांसाठी राखीव ठेवलेले असल्यामुळे फास्टॅग बसवूनही जवळपास प्रत्येक टोल नाक्यावर वाहनांच्या रांगा लागल्याचे दिसते त्यामुळे वेळेचा अपव्ययही टाळता येत नाही, यामुळे वाहन चालक व प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असल्याने वाहनांवर लावलेला फास्टॅग स्कॅन न झाल्यास वाहने मोफत सोडावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य माल व प्रवासी वाहतूक संघटनेने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या फास्टॅग प्रणालीतील तांत्रिक अडचणींची माहिती घेवून त्या दूर करण्याबाबत व सदर सायबर हॅकर्सना तात्काळ अटक करून सदरहू टोल यंत्रणा सक्षम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०८-२०२०) :** (१) अशंत: खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजीपासून एकाच वेळी देशभर फास्टॅग टोलवसूली योजना सुरु करण्याचे जाहीर केले होते. तथापि, राज्य शासनाच्या अखत्यारित फास्टॅग प्रणाली सुरु करण्याचे दिनांक निश्चित केले नव्हते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) हे खरे नाही.

रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्रालय भारत सरकारच्या निदर्शनानुसार प्रत्येक टोलवर एक दिशेने एक लेन वर कॅश घेण्यात येत आहे आणि उरलेल्या लेन वर फास्टॅग द्वारे टोल जमा करण्यात येत आहे.

रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक तत्वानुसार खाली नमूद केलेल्या प्रकल्पावर पथकर वसुली सार्वजनिक बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिनस्त प्रगतीत आहे.

१) पुणे-खेड रा.म.क्र.६०, २) नाशिक सिन्नर रा.म.क्र.६०

३) वैनगंगा पुल रा.म.क्र.५३, ४)फेकरी उड्डाणपूल रा.म.क्र.५३

तथापि काही वाहनधारकांकडे फास्टॅग उपलब्ध नसल्यामुळे व स्थानिक वाहन धारकांच्या फास्टॅग साठी विरोध असल्याने त्यांना हायब्रिड लेनमधुन (रोख) जाणे अपरिहार्य आहे. त्यामुळे काही वेळेस वाहनांच्या रांगा दिसून येतात ही बाब अंशत: खरी आहे. तथापि सर्व वाहनधारकांनी फास्टॅग उपलब्ध केल्यास अशा प्रकारची अडचण उद्भवणार नाही.

(५) तांत्रिक सल्लागारांची मदत घेऊन त्रुटी दूर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

फास्टॅग प्रणाली IHMCL मार्फत राबविण्यात येत आहे व NHAI च्या Toll Free Plaza वर त्याचे कार्यान्वयन करण्यात येत आहे. काही अडचणी असल्यास IHMCL च्या Portal वर तसेच संबंधित बँकेच्या Customer Care वर संपर्क साधून Fastag धारक त्यांचे शंका निरसन करु शकतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली शहरात रस्त्याच्या कामासंदर्भातील अंदाजपत्रकीय नकाशातील बाबी गायब असल्याबाबत**

**(११) ९१२ (०३-०४-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरात राष्ट्रीय महामार्गाच्या धर्तीवर सुरु असलेल्या रस्त्याच्या कामकाजासंदर्भातील अंदाजपत्रकीय नकाशातील बाबी गायब असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेच्या रस्त्यावरील ३०० मीमी व्यासाचा सर्व्हीस पाईप व ६०० मिमी व्यासाचा पावसाचे पाणी वाहून नेणारा पाईपही गायब असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार यास जबाबदार असणा-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

हिंगोली शहर रस्ते विकास प्रकल्पांतर्गत संपुर्ण कामे शहर अभियंता व उप अभियंता, नगरपरिषद हिंगोली यांच्या तांत्रिक देखरेखीखाली मंजूर अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार, तसेच शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि. २८.०३.२०१८ मधील मार्गदर्शक तत्वानुसार त्रयस्थ तपासणी व गुणवत्ता अहवालानुसारच करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दर्यापूर (जि.अमरावती) येथे शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम करणेबाबत

**(१२) १०६८ (१६-०३-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर हे जिल्ह्यापासून ६० कि.मी दूर असून दर्यापूर शहराच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय विश्रामगृह नसल्याने दर्यापूर येथे काही कार्यक्रमास्तव येणाऱ्या पदाधिकारी, अधिकाऱ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय विश्रामगृह बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) व (२) दर्यापूर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह नाही. परंतू तिथे जिल्हा परिषदेचे विश्रामगृह असून त्यात ४ कक्ष उपलब्ध आहेत.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह बांधकामाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत तहसिलदार, दर्यापूर यांच्याकडे मागणी करण्यांत आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### तुळजापुर (जि.उस्मानाबाद) येथे एज्युकेशन हबची निर्मिती करण्याबाबत

**(१३) १३२४ (२०-०३-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापुर (जि.उस्मानाबाद) येथे जागतिक स्तरावरच्या एज्युकेशन हबची निर्मिती करण्याबाबत येथील लोकप्रतिनिधींची वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापुर येथील श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानाकडे सदरहू शैक्षणिक हबसाठी लागणारी जागा उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळजापुर येथे जागतिक स्तरावरचे शैक्षणिक हब निर्माण करण्यासाठीचा अहवाल तयार करुन शासनाकडे पाठविण्याबाबत शासनाने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना सुचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व तद्नुसार तुळजापुर तेथे जागतिक स्तरावरील शैक्षणिक हब निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२०-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानामार्फत एज्युकेशन हबसाठी लागणाऱ्या जागेच्या उपलब्धतेबाबत शासकीय जमीन, मठाची जमीन याबाबत माहिती घेऊन नकाशावर Marking करुन घेण्यात आलेली आहे. सदर माहिती श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानाच्या आगामी विश्वस्त समितीच्या बैठकीत सादर करण्यात येणार आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ या रस्त्याच्या कामाबाबत

**(१४) १३६८ (१६-०३-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ व अन्य निर्माणाधीन रस्त्यांवर दुरूस्ती, खड्डे बुजविणे तसेच सुरक्षा नियमांची व्यवस्था करण्यास कसूर करणा-या संबंधित कंत्राटदार व यंत्रणाप्रमुख यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशा सूचना जिल्हाधिकारी तथा रस्ता सुरक्षा समिती प्रमुख यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सूचनेनुसार आतापर्यंत किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१७-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.
मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ते सुरक्षा समितीच्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्याकरिता दि.२१.११.२०१९ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अशा प्रकारची चर्चा होऊन निर्देश देण्यात आले.
(२) बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील आहे. सदर रस्त्याच्या अमरावती ते चिखली भागाच्या

चौपदरीकरणाचे काम सन २०१६ मध्ये आय.एल.ॲण्ड एफ.ए स.कंपनीमार्फत हाती घेण्यात आले होते. परंतु कंपनीच्या आर्थिक अडचणीमुळे सदर काम बंद पडले. त्यामुळे सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीयोग्य ठेवण्याच्या दृष्टिने आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे प्राधिकरणामार्फत करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीयोग्य आहे. तसेच सदर कामाकरिता मेससर्स आय.एल.ॲण्ड एफ.एस. कंपनीसोबत केलेला करारनामा दि.०२.०८.२०१९ रोजी खंडीत करण्यात आला असून चौपदरीकरणाच्या मूळ उर्वरित कामाकरिता प्राधिकरणाच्या दिल्ली मुख्यालय यांचेमार्फत निविदा दि.२०.११.२०१९ ला काढण्यात आल्यानंतर दि.०७.०२.२०२० लेटर ऑफ अवार्ड देण्यात आले आहे. करारनामा करण्याची कार्यवाही नवी दिल्ली मुख्यालय स्तरावर प्रगतीत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,अमरावती यांनी कळविले आहे.

याखेरीज बुलढाणा जिल्ह्यातील चिखली-मेहकर (रा.म.क्र.५४८ सी.सी.), चिखली-खांमगांव (रा.म.क्र.५४८ सी.सी.), अजिंठा-बुलढाणा (रा.म.क्र.७५३ ई) वगैरे अन्य रस्त्यांसह निर्माणाधीन २४५ कि.मी.लांबीपैकी सुमारे १९४ कि.मी. लांबीचे काम सद्य:स्थितीत पूर्ण झाले असून उर्वरीत ५१ कि.मी. लांबी सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टिने खड्डे भरणे, तात्पुरता वळण रस्ता तयार करुन नियमितपणे वाहतूकीयोग्य ठेवणे/ धुळ प्रतिबंधासाठी नियमितपणे पाणी मारणे/आवश्यक ठिकाणी दिशादर्शक सूचना फलक लावणे / रिफ्लेक्टर पट्टया लावणे वगैरे कामे करुन घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेबाबत**

**(१५) १५१५ (२१-०३-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथे प्रशासकीय इमारत नसल्याने विविध शासकीय कार्यालये खाजगी जागेत वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली असल्याने ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना शासकीय कामांकरिता विविध ठिकाणी ये-जा करावी लागते,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे चिखली येथे सर्व कार्यालयांना एका ठिकाणी आणण्यासाठी प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याची मागणी होत आहे, याकरिता चिखली येथे प्रशासकीय इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे नागपूर येथील मा. मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिखली येथे प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.
काही शासकीय कार्यालये खाजगी जागेत कार्यरत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय इमारती बांधकामाविषयी करावयाची पुढील आवश्यक कार्यवाही हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशी (जि.उस्मानाबाद) तालूक्यात शासकीय विश्रामगृह नसल्याबाबत**

**(१६) १९११ (१६-०३-२०२०). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी तालूक्याची निर्मीती होऊन २० वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप या तालूक्याला हक्काचे शासकीय विश्रामगृह नसल्यामुळे स्थानिक शेतक-यांमध्ये, लोकप्रतिनिधींमध्ये व सरकारी प्रतिनिधी यांच्यामध्ये संवाद होत नाही त्यामुळे स्थानिकांनी वेळोवेळी शासकीय विश्रामगृहासाठी सनदशिर मार्गाने मागणी केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासाच्या दृष्टीने त्या भागाचे लोकप्रतिनिधी, अधिकारी, मंत्री, केंद्राचे प्रतिनिधी आणि स्थानिक नागरीकांसाठी संवाद किंवा बैठकांचे आयोजन करण्यांसाठी विश्रामगृहाची सोय नसल्यामुळे दौरा आटोपता घेतात आणि फक्त नागरीकांची निवेदने स्वीकारण्यांपलीकडे काहीच होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक शहराला विश्रामगृहाची सोय असते परंतु हा तालूका वंचित असल्यामुळे शेजारील कळंब किंवा भुम तालूक्यात लोकप्रतिनिधींना व अधिका-यांना भेटाला जावे लागत असल्याने तेथे होणा-या गर्दीमुळे लोकप्रतिनिधींशी व्यवस्थीत संवाद होत नाहीत त्यामुळे वाशी तालूक्यातील विकासाच्या कामांवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाशी येथे शासकीय विश्रामगृह बांधण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.
(४) विश्रामगृहाच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव, प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यांत आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) शहरातील विविध शासकिय कार्यालयांकरीता एकत्रीत प्रशासकिय इमारत उभारण्याबाबत**

**(१७) २०४७ (२१-०३-२०२०). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) शहराच्या मध्यवर्ती व अपुऱ्या जागेत तहसील कार्यालय व पोलीस ठाणे असल्याने कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या ध्येय धोरणानुसार पेण तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये उपविभागीय अधिकारी कार्यालय-पेण येथील जागेत एकत्रीत स्थलांतरीत करण्याकरीता जागा उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व यंत्रणा एकत्रित आणून कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची गैरसोय दुर करण्याकरीता सर्व शासकिय कार्यालयांसाठी एकत्रीत प्रशासकिय इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

कार्यालयीन जागा अपुरी असल्याबाबत तहसील कार्यालय तसेच पोलीस ठाण्याकडून तक्रार प्राप्त नाही.

(२) प्रशासकीय इमारत बांधकामाकरिता आवश्यक जागा सार्वजनिक बांधकाम विभागास अद्याप हस्तांतरीत करण्यांत आलेली नाही.

(३) जागा हस्तांतरणानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार बांधकामाविषयक पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्हाळा व मोहटोला (ता.देसाईगंज, जि.गडचिरोली) येथील दोन व्यक्तींना एकच आधार क्रमांक मिळाला असल्याबाबत**

**(१८) २०९२ (१६-०३-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज (जि.गडचिरोली) तालुक्यातील श्री.दागो भिका राजगडे (मु.किन्हाळा) व श्री.हंसराज नानाजी लोखंडे (मु.मोहटोला) या दोन व्यक्तींना एकच आधार क्रमांक मिळाला असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहील्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.दागो भिका राजगडे यांचे आधार कार्ड सदोष असल्याने त्यांना शासकीय योजनांच्या लाभापासुन वंचीत रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१३-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. अशी बाब तांत्रिक कारणामुळे घडली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही. एखाद्या व्यक्तीचे आधार कार्ड दोषपूर्ण असले किंवा आधार कार्ड नसल्यावर सुध्दा भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण, भारत सरकार, (UIDAI) यांच्या दि.२४ ऑक्टोबर, २०१७ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ४ नुसार एखाद्या व्यक्तीचे आधार कार्ड दोषपूर्ण असेल किंवा सदर व्यक्तीकडे आधारकार्ड नसेल अशा व्यक्तीस इतर दस्तऐवजांच्या आधारे शासकीय योजनांचा लाभ देण्याची तरतूद आहे.
(३) भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण, भारत सरकार यांचेकडे जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी पुढील कार्यवाहीकरीता प्रस्ताव सादर केला असून, त्यांचेकडून त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव ते औरंगाबाद चौपदरीकरणाच्या रखडलेल्या कामाबाबत**

**(१९) २१७८ (१६-०३-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) जळगाव ते औरंगाबाद चौपदरीकरणाचे काम रखडलेले आहे तसेच महामार्गास समांतर रस्ते नसल्याने गत दोन महिन्यात अपघांताचे प्रमाण वाढलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौपदरीकरणाचे काम अतिशय संथगतीने होत असून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी जळगाव विभागात आयोजित केलेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर नागरिकांच्या वतीने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गावरुन दररोज प्रवास करणा-या शेकडो वाहनचालक व प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघात होणे हे नित्याचे झालेले आहे तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण त्यांच्या जबाबदाऱ्या एकमेकांवर ढकलण्याचे काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने जळगाव ते औरंगाबाद चौपदरीकरणाच्या रखडलेल्या कामाबाबत व त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१३-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर रस्त्याच्या मंजूर दुपदरीकरणाच्या कामाऐवजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जुलै २०१७ दरम्यान चौपदरीकरणासाठी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कामाच्या मंजूर वावात झालेल्या बदलास सक्षम प्राधिकरणाकडून मंजुरी प्राप्त करुन घेणे तसेच मूळ कंत्राटदार दिवाळखोरीत निघाल्यामुळे निविदा तरतूदीनुसार पर्यायी कंत्राटदारांची नियुक्ती करणे वगैरे उपाययोजना करुन सदयस्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

जळगाव ते औरंगाबाद चौपदरीकरणाचे १४७ कि.मी.चे काम सदयस्थितीत प्रतिदिन सुमारे १.५० कि.मी. नुसार पूर्ण करण्यात येत असून कामाची प्रगती समाधानकारक आहे. औरंगाबाद ते जळगांव रस्त्याची १४७ पैकी १२२ कि.मी.ची एक बाजु वाहतुकी करिता सुस्थितीत करण्यात आली असून उर्वरीत लांबीचे काम प्रगतीपथावर आहे व मार्च २०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

**औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२०) २१८३ (१६-०३-२०२०). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या सभेत औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्याचा बहुमताने ठराव मंजूर करून तो शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील ठरावास मंजुरी देवून केंद्राकडे अद्यापही पाठविला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्राकडे सदरहू ठराव न पाठविण्याची कारणे काय आहेत व या ठरावास केंद्र शासनाची मंजुरी घेण्यासाठी कोणता पाठपुरावा केला आहे व याबाबतची सध्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२०-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) "औरंगाबाद विभागाचा मराठवाडा, औरंगाबाद जिल्हा, औरंगाबाद उप विभाग, औरंगाबाद तालुका, व औरंगाबाद गाव याचे "संभाजीनगर" असे नामकरण करण्याबाबत महसूल व वन विभागाने दि. ०९.११.१९९५ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली होती तसेच औरंगाबाद शहराचे "संभाजीनगर" असे नामकरण करण्याबाबत नगर विकास विभागाने दिनांक ०९.११.१९९५ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध केली होती. सदर अधिसूचनेविरुध्द श्री. महम्मंद मुश्ताक अहमद, तत्कालीन नगरसेवक यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे क्र.५५६५/९५ व ५५६६/९५ अशा दोन याचिका दाखल केल्या होत्या. सदर दोन्ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या. त्याविरुध्द श्री. अहमद यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.९४१/९६ व ९४२/९६ दाखल केल्या होत्या. त्यावर दि.२९.०१.१९९६ रोजी सुनावणी होऊन सर्वोच्च न्यायालयाने दि.१७.०१.१९९६ रोजी जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेश दिले. गाव/शहराचे नाव बदलण्याचा विषय केंद्र शासनाच्या

अखत्यारितील असून तो राज्यशासनाच्या अधिकार कक्षेत येत नाही. त्यानुसार दिनांक २७.०६.२००१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार महसूल व वन विभाग व नगर विकास विभागाने अनुक्रमे दिनांक ०६.०९.२००१ व दिनांक ०३.१०.२००१ च्या अधिसूचनेद्वारे दिनांक ०९.११.१९९५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप अधिसूचना रद्द केल्या. सदर अधिसूचना रद्द केल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १९.१२.२००२ रोजी प्रस्तुत याचिका निकाली (Dismiss) काढली आहे.

गाव / शहराचे नाव बदलण्यासंदर्भातील केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने त्यांचे पत्र क्रमांक १३०/५३ दिनांक ११ सप्टेंबर १९५३ अन्वये निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे आवश्यक असून त्यानुसार प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येतो.

सदर मार्गदर्शक तत्वे विचारात घेवून औरंगाबाद शहराचे संभाजीनगर असे करण्याचा सविस्तर प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून दि. ०४.०३.२०२० रोजी शासनास प्राप्त झाला. "

या संदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत असून त्यांचे अभिप्राय तसेच इतर आवश्यक मान्यता प्राप्त होताच प्रस्ताव केंद्र शासनास रितसर पाठविण्यात येईल.

---

### शेंबा-गोशिंग-जयपुर वरवंड (जि.बुलढाणा) या रस्त्यावर गोशिंग गावाजवळ पुलाचे बांधकाम मंजूर करणेबाबत

**(२१) २२३६ (१६-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसिंग जयपुर वरवंड (जि.बुलढाणा) या रस्त्यावर गोसिंग गावाजवळ छोट्या मोरी/रपटा वरून दरवर्षी पावसाळ्यात पुराचे पाणी राहात असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतूक बंद होत असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोताळा तालुक्यातील पलढग मध्यम प्रकल्प हा सतत ओसंडून वाहत असल्याने या रस्त्यावर पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन रस्त्यावरील वाहतुक अनेक वेळा विस्कळीत होत असून परिसरातील नागरिकांची प्रचंड गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेंबा- गोसिंग-जयपूर वरवंड, (जि.बुलढाणा) रस्त्यावर गोशिंग गावाजवळ पुलाचे बांधकाम मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे,

तथापि प्रश्नांकित पुलांचे ठिकाण हे मोताळा जयपूर गोसिंग निपाणा प्रजिमा-१८ या मार्गावर गोसिंग गावाजवळ असून, त्याठिकाणी अस्तित्वातील दोन रपट्यांवरुन मोताळा तालुक्यातील पलढग मध्यम प्रकल्पाच्या सांडव्यामुळे व अतिवृष्टीमध्ये रपट्यांवरुन सुमारे ४

ते ६ तासांसाठी वाहतुक व रहदारी बंद होते. मात्र पावसाचे प्रमाण कमी झाल्यावर वाहतुक सुरळीतपणे सुरु असते.
(३) व (४) सद्य:स्थितीत गोसिंग गावा जवळील दोन्ही नाल्याच्या ठिकाणी अस्तित्वात असलेले २२.०० मिटर (रिटेनींग वॉलसह) लांबीचे २ रपटे खोलगट भागात आहेत. सदर ठिकाणी रपट्यांऐवजी लहान पुलांचे बांधकामाचे नियोजन निधी, निकष व प्राधान्य क्रमाच्या अधिन राहुन करण्यात येईल.

---

**शासकीय विश्रामगृह नांदुरा (जि.बुलढाणा) चे विस्तारीकरण व नूतनीकरणाबाबत**

**(२२) २२३७ (२१-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय विश्रामगृह नांदुरा (जि.बुलढाणा) येथील विश्रामगृहातील कक्ष, सभागृह दालन इत्यादी अतिशय छोटे असून इमारत जुनी झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदुरा येथील विश्रामगृहातील व्हीआयपी कक्ष विस्तारीकरणासह नूतनीकरण करणेबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने पाहणी करुन शासकीय विश्रामगृह नांदुरा चे विस्तारासह नूतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) नांदुरा येथील शासकीय विश्रामगृहाच्या विस्तारीकरणाच्या कामास दि.२७.०२.२०२० रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली असून सदर कामाचा चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात समावेशही करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकरी तसेच विद्यार्थी यांना वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ देणाऱ्या महा.डी.बी.टी पोर्टलच्या कारभाराबाबत**

**(२३) २५११ (०२-०४-२०२०). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकरी तसेच विद्यार्थी यांना केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या वैयक्तिक लाभ देणाऱ्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी महा.डी.बी.टी. वेब पोर्टल ची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र लाभर्थ्यांना तसेच विद्यार्थ्यांना शासनाच्या माध्यमातून मिळत असलेली शिष्यवृती देखील अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी देण्यात आलेल्या शेतकरी कर्ज माफी योजनेत या यंत्रणेकडून अनेक प्रकारच्या चुका झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकरी तसेच विद्यार्थी यांना शासनाच्या विविध वैयक्तीक योजनांचा लाभ देण्यासाठी शासनाकडून पर्यायी यंत्रणा निर्माण करण्याबाबत कोणती उपाययोजना होणार आहे,
(५) असल्यास, शासनाकडून याबाबत कोणत्या प्रकारची कार्यवाही सुरु करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१३-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. महाडिबीटी पोर्टलच्या माध्यमातून आतापर्यंत १९,८५,३२८ एवढया पात्र विदयार्थ्यांना रु. ४१५४.४५ कोटी इतक्या रकमेच्या शिष्यवृत्ती वाटप करण्यात आले आहे.
(३) अंशत: खरे आहे. यापूर्वीच्या शेतकरी कर्ज माफी योजनेत काही तांत्रिक त्रूटी मूळे सदर प्रणाली कार्यान्वित होऊ शकली नव्हती.
(४) व (५) शासकीय वैयक्तिक लाभ योजनांतर्गत लाभांचे थेट हस्तांतरणासाठी महाडीबीटी पोर्टल विकसीत करण्यात आले असून ते ऑक्टोबर २०१८ पासून कार्यान्वित झाले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माणगाव (जि.रायगड) येथील मोर्बा मार्गावरील जुन्या पंचायत समिती कार्यालयाजवळील छोट्या दुकानांचे पुनर्वसन होण्याबाबत

**(२४) २५९९ (२०-०३-२०२०). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) येथील मोर्बा मार्गावरील जुन्या पंचायत समिती कार्यालयाजवळील दुकाने व टप-या महामार्ग विभागाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निष्कासित केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाधित झालेल्या दुकानदारांचे पुनर्वसन अद्याप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप दुकानदारांचे पुनर्वसन न होण्यामागचे कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दुकानदारांचे व व्यापा-यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२०) :** (१) माणगावातील (जि.रायगड) रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात आली आहे

केंद्रींय रस्ते वाहतुक व महामार्ग विभाग (MoRTH), मंत्रालयाने, माणगाव-म्हसळा-दिघीपोर्ट हा रस्ता नवीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ फ मध्ये घोषित केला आहे. सदर रस्ता दि.२३ जुन, २०१७ रोजी सा.बां.विभागाकडून म.रा.र.वि.महामंडळास हस्तांतरीत झाला असुन, सदर रस्तांचे दुहेरीकरणाचे (२ lane with paved shoulder) बांधकाम EPC तत्वावर केंद्रींय मंत्रालयाच्या निर्देशानुसार, म.रा.र.वि.महामंडळ (MSRDC), मुंबई मार्फत हाती घेण्यात आले आहे.

तसेच, भूमि अभिलेख विभागाकडून रस्त्याची पूर्वी संपादीत झालेली जागेची हद्दकायम करुन, सदर रस्त्यातील अतिक्रमणीचे बांधकामे काढण्यात आली आहेत.

(२) रस्त्याच्या हद्दीतील अतिक्रमणे काढली असल्याने पुर्नवसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड तालुक्यात (जि.रायगड) विविध विभागातील कार्यालयाकरींता एकच प्रशासकिय इमारत उभारण्याबाबत**

**(२५) २६०१ (२१-०३-२०२०). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिटीश काळापासून तालुक्याचा दर्जा असलेल्या महाड (जि.रायगड) तालुक्यात विविध विभागाची शासकीय कार्यालये भाड्याच्या इमारतीमध्ये सुरू असल्यामुळे गत अनेक वर्षापासून शासनाचे लाखो रूपये कार्यालयांच्या भाड्यापोटी खर्च होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील प्रशासकीय इमारतीसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध असताना जागे अभावी प्रशासकीय इमारतीचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासकीय कार्यालयाच्या भाड्यापोटी खर्च होणारे शासनाचे लाखो रूपये वाचवुन प्रशासकीय इमारत उभारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाड शहरातील काही विभागांचे कार्यालय भाडे तत्वावर खाजगी जागेत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रशासकीय इमारतीकरीता जागा तसेच निधीही उपलब्ध नाही.

(३) प्रशासकीय इमारतीकरीता जागा उपलब्ध होण्याबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**चंद्रपूर शहर तसेच नागपूर, वरोरा, वर्धा, यवतमाळकडे जाणा-या मुख्य रस्त्याला जोडलेल्या अनेक गावालगतच्या मुख्य रस्त्यावर रहदारी विषयक समस्या निर्माण झाल्याबाबत**

**(२६) २८१९ (२१-०३-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहर तसेच नागपूर, वरोरा, वर्धा, यवतमाळकडे जाणा-या मुख्य रस्त्याला जोडलेल्या जुनी पडोली, विचोडा, छोटा नागपूर, तिरवंजा, कवठी, भटाडी व चिंचोली इ. गावालगतच्या मुख्य रस्त्यावर रेल्वे पुलाखाली खड्डे खोदुन लोखंडी खांब उभारुन वाहतूकीची समस्या निर्माण केल्याबाबत मा. लोकप्रतिनिधी, बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ चंद्रपूर यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. ग्रामपंचायत पडोली यांनी सदर निवेदन दिले आहे.

(२) चंद्रपूर तालुक्यातील पडोली-विचोडा-तिरवंजा-छोटा नागपूर-दुर्गापूर या प्रजिमा-४० रस्त्याची वाहतूक इरई नदीवरून जाणा-या रेल्वे पुलाखालून सुरू होती. परंतू vertical clearance कमी असल्याच्या कारणामुळे रेल्वे विभागातर्फे दि.२६.११.२०१९ रोजी रस्त्याच्या दोन्ही बाजूस चर खोदून लोखंडी खांब उभारून वाहतूक बंद करण्यात आली होती. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिलेल्या निर्देशानुसार त्याच दिवशी सदर रस्ता हलक्या वाहतुकीस खुला करण्यात आला होता. तसेच जड वाहतूकीस निर्बंध करण्याकरीता steel height Restriction Barrier देखील लावण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये आधारकार्ड केंद्रावरील अनियमितता दूर करून आधार कार्ड केंद्राची संख्या वाढविणेबाबत**

**(२७) २८५६ (१६-०३-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये सोळा अधिकृत आधार कार्ड केंद्र उभारण्यात आली असून काही विशिष्ट आधार कार्ड केंद्रावर नवीन आधार नोंदणी व आधार कार्ड मधील दुरुस्ती करण्याकरीता नागरिकांकडून नियमापेक्षा जास्त पैसे घेत असल्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आधारकार्डावरील नावातील अक्षरात दुरुस्तीसाठी नागरिकांकडून काही विशिष्ट आधार कार्ड केंद्रावर १००० ते १२०० रु. सक्तीने घेतले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अपुऱ्या केंद्रांच्या संख्येमुळे नागरिकांना आधार कार्ड काढण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी चिंचवड यांनी लेखी पत्राद्वारे नवीन आधार केंद्र सुरु करणे बाबत मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आधार केंद्रावरील अनियमिततेबाबत भरारी पथकामार्फत तपासणी करून कार्यवाही करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात नवीन आधार केंद्र सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१५-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालीका क्षेत्रामध्ये ८८ आधार केंद्रे महानगरपालिका कार्यालय, बँक, पोस्ट ऑफिस, बीएसएनएल कार्यालय, आरोग्य विभाग कार्यालय येथे कार्यरत आहेत. तथापि राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून व भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण, भारत सरकार, (UIDAI) यांच्या निर्देशानुसार सध्या ही आधार कार्ड केंद्रे बंद ठेवण्यात आली आहेत.
(४) हे खरे आहे.
(५) आधार केंद्रावरील अनियमिततेबाबत भरारी पथकामार्फत तपासणी कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत**

**(२८) ३०६० (०२-०४-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांना बुजविण्याकरिता दरवर्षी देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खड्डे बुजविण्याकरिता निधी असूनही नियोजित कालावधीत खड्डे न बुजविता केवळ त्या कामावरील रक्कमेची उचल केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वार्षिक देखभाल दुरुस्ती फंडाच्या नावाखाली दरवर्षी कोट्यवधी रुपयांची तरतुद करुनही दरवर्षी खड्डे तयार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांच्या संगनमताने काम न करताच बिलाची रक्कम वाटून घेतली जाते व कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती देणारे कामाचे माहिती फलकही लावले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. दरवर्षी होणा-या अतिवृष्टीमुळे खड्डे पडतात, त्यामुळे रस्त्यांची दुरुस्ती करणे अनिवार्य आहे.
(२) नाही.

कंत्राटदाराने केलेल्या कामानुसार व गुणवत्तेनुसार देयकाची अदायकी करण्यात आलेली आहे.
(३) नाही, दरवर्षी होणा-या अतिवृष्टीमुळे पडलेले खड्डे द्विवार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत बुजविण्यात येतात.
(४) नाही.

कंत्राटदाराने केलेल्या कामानुसार व गुणवत्तेनुसार देयकाची अदायकी करण्यात आलेली आहे. कंत्राटदार व अधिकारी, यांच्या संगनमताने कोणत्याही प्राकारची अफरातफर झाल्याचे निदर्शानास आले नाही. तसेच योजनेत्तर कामावर (Non Plan) माहिती फलक लावण्याची बाब करारनाम्यांतर्गत समाविष्ट नसल्याने माहिती देणारे फलक (बोर्ड) लावण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयामध्ये अंतर्गत रस्ते, पुल व गावजोड रस्ते तयार करण्याबाबत

**(२९) ३०६६ (१६-०३-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील दक्षिण विभागातील डॉ.शंकररावजी चव्हाण विष्णूपरी प्रकल्प हा आशिया खंडातील क्रमांक २ चा उपसा जलसिंचन प्रकल्प असुन या प्रकल्पामुळे नांदेड येथील ८० टक्के ग्रामीण क्षेत्र मशागतीखाली येत असुन या मशागतीसाठी ये-जा करण्यासाठी रस्ते व पुल नसल्याने तेथील ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागातील स्थानिक नागरिकांनी वारंवार शासनाकडे अंतर्गत रस्त्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकल्पातील नगदी उत्पन्न पीक जसे ऊस, केळी तसेच दक्षिण नांदेड येथील शेतमाल, भाजीपाला व फुले ही नगदी पिके शेतकरी मोठ्या प्रमाणात घेत असुन त्यांना मालाच्या वाहतुकीकरिता आवश्यक रस्ते व पुल नसल्याने त्यांना माल बाजारपेठेत विक्रीकरीता नेण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नांदेड जिल्ह्यामध्ये अंतर्गत रस्ते, पुल व गावे जोडण्याकरिता रस्ते तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन जलसिंचन प्रकल्प क्षेत्र सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद, नांदेड कडील विविध योजनांतर्गत रस्ते व पूलांची कामे पूर्ण करण्यात आली असून प्रगतीपथावरील/निविदा स्तरावरील कामे निधी व निकषाचे अधीन राहून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुक्ताईनगर नगरपंचायतीतर्फे (जि.जळगांव) करण्यात आलेल्या रस्ता कॉँक्रिटीकरणाच्या कामात झालेली अनियमितता

**(३०) ३१८४ (०५-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर नगरपंचायतीतर्फे (जि.जळगांव) संपूर्ण शहरातील प्रत्येक प्रभागात गत वर्षात रस्ता कॉँक्रिटीकरणाचे काम केले असून सदरील कामे ही अंदाजपत्रकानुसार झालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कामांच्या निविदांची फेर पडताळणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या फेर पडताळणीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२०) :** (१) हे खरे नाही.

मुक्ताईनगर नगरपंचायतीने रस्ता कॉँक्रिटीकरणाची कामे ई-निविदा प्रक्रिया राबवून अंदाजपत्रकानुसार करण्यात आली असून, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी खात्री करुन प्रमाणित केले आहे. तसेच सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याच्या चाचण्या संत गाडगेबाबा अभियांत्रिकी महाविद्यालय, भुसावळ व सहाय्यक संशोधन अधिकारी, क्षेत्रीय प्रयोगशाळा, जळगाव यांच्याकडून केल्या असून, त्यांनी साहित्य समाधानकारक असल्याबाबत

अहवाल दिला आहे. त्याचप्रमाणे झालेल्या सर्व कामांची शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव या त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी (Third Party Audit) करण्यात आली असून, सदर कामे योग्य, समाधानकारक व अंदाजपत्रकानुसार असल्याचे त्यांनी प्रमाणित केले असल्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी अहवाल सादर केला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी वाडा-मनोर (जि.पालघर) रस्त्यावरील सापने व पेननाका येथील पुलाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) ३३३४ (२१-०३-२०२०). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी वाडा-मनोर (जि.पालघर) रस्त्यावरील सापने व पेननाका येथील पुलाचे काम अनेक वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू काम अपूर्ण राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू काम मे.सुप्रीम कंपनीस देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) भिवंडी-वाडा-मनोर (जि.पालघर) रस्त्यावरील सापने व पेननाका येथील पुलांचे ७५ टक्के काम पुर्ण झालेले आहे. सदरहू पुलांच्या पोचमार्गाचा काही भाग वनक्षेत्रातून जात असल्याने वनविभागाने हरकत घेतली आहे. त्यामुळे पुलांची कामे पुर्ण होऊ शकली नाहीत.

मौजे निगुडवाडी, ता. चिपळून, जि. रत्नागिरी येथील एकूण २२.६६ हेक्टर पर्यायी जमिन वन विभागास प्रकल्पास लागणा-या ११ हेक्टर वन जमिनीच्या बदल्यात उपलब्ध करुन देण्यात आली असून रस्त्यासाठी आवश्यक वन जमीन सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. पर्यायी जमिन हस्तांतरणा नंतर वन विभागाची जमिन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात मिळाल्यावर उर्वरित कामे हाती घेण्यात येतील.

भिवंडी-वाडा-मनोर या प्रकल्पाचे काम मे. सुप्रिम मनोर-वाडा-भिवंडी इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस देण्यात आले होते. तथापि, सदर कंत्राटदार रस्त्याची देखभाल व दुरुस्ती व्यवस्थितपणे करीत नसल्याने दिनांक ११.१०.२०१९ रोजी कंत्राटदारासमवेतचा करारनामा रद्द करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील शिवणी विमानतळ विस्तारीकरणाबाबत**

**(३२) ३५०३ (२१-०३-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील शिवणी विमानतळ विस्तारीकरणासाठी भुसंपादन मोबदल्याकरीता ७९ कोटी रुपयांच्या नीधीच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणामार्फत शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी दिर्घकाळापासून मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनस्तरावर प्रस्ताव मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१०-०८-२०२०) :** (१) (२) व (३) अकोला (शिवणी) विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी सुमारे २२.२४ हे.आर. खाजगी जमीन संपादनासाठी सुमारे ९५.४८ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून दि.१८.०९.२०१९ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. तथापि, सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी २२.२४ हे. आर भूसंपादनापूर्वी प्रथमत: त्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भगूर (जि.नाशिक) येथील रेल्वेच्या बोगद्याचे विस्तारीकरण करणेबाबत**

**(३३) ३५५८ (२१-०३-२०२०). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील भगूर शहरात प्रवेश करताना रेल्वेचा बोगदा छोटा असल्याने येथून वाहतुक करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेलाही मटन मार्केट हटविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत परंतू अद्यापही मार्केट हटविले जात नसल्याने बोगदा विस्तारीकरणाचे काम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भगुर नगरपालिकेला शासनाने त्वरीत आदेशित करून शासनाकडून आलेला निधीतून बोगद्याचे विस्तारीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) विषयांकित भुयारी मार्गासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.३.४२ कोटी निधी रेल्वे प्रशासनाकडे वर्ग केला आहे व सदर भुयारी मार्गाचे काम रेल्वे प्रशासनामार्फत हाती घेण्यात आले आहे

---

**मोहदा ते करंजी (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३४) ३६२० (२१-०३-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहदा ते करंजी (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील रस्त्याची मागील ब-याच वर्षापासुन कोणत्याच प्रकारची दुरूस्ती केली नसल्याने रस्त्यावर जागोजागी खड्डे पडुन रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता हा राज्यमहामार्ग असल्याने रस्त्यावर प्रवाशांची वर्दळ असून रस्त्याला जागोजागी खड्डे पडल्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर राज्य महामार्गाच्या दुरूस्तीकरीता निधी उपलब्ध करून दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) व (२) पावसाळ्यातील पाण्यामुळे व जड वाहतुकीमुळे २३.२० कि.मी. लांबीपैकी १४.०० कि.मी. लांबीत रस्त्याचा पृष्ठभाग नादुरुस्त झाला आहे. तथापि, सदर रस्त्यावरील खड्डे पॅचेसने भरण्यात आले आहेत.
(३) व (४) याबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमाच्या अधिन राहुन सदर काम हाती घेण्यात येईल.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील बोरीबेल येथे भुयारी मार्ग होणेबाबत**

**(३५) ३७०९ (१८-०३-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील बोरीबेल या ठिकाणी भुयारी मार्ग (आर यु बी) करण्याबाबत व याकरिता ५ कोटी रुपयांचा निधी मिळणेबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास व त्यापूर्वी देखील मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी भुयारी मार्ग (आर यु बी) होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विषयांकित पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण निकष, अग्रक्रम व निधी उपलब्धतेच्या मर्यादा यांच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**भीमा (ता.दौंड,जि.पुणे) नदीवरील टाकळी भीमा (दौंड) ते टाकळी भीमा (शिरूर) पुल व मौजे गार ते दौंड शहर या पुलाच्या प्रलंबित मागणीबाबत**

**(३६) ३७१० (२०-०३-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मौजे टाकळी भीमा व शिरूर तालुक्यातील मौजे टाकळी भीमा या गावांना जोडणाऱ्या पुलास मंजुरी मिळाली असून अद्याप निधी उपलब्ध झाला नसल्याने कामाला सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे गार व परिसरातील नागरिकांना शेजारील श्रीगोंदा तालुक्यात व त्यालगतच्या गावामध्ये जाण्यासाठी लांबून जावे लागते त्यामुळे मौजे गार ते दौंड शहर या दरम्यान भीमा नदीवर उड्डाण पूल बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास व त्यापूर्वी देखील अनेक वेळा केलेली मागणी अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भीमा नदीवरील उड्डाण पुलास मंजुरी देणेबाबत मा. सार्वजनिक मंत्री यांनी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर टाकळी भिमा पुलास रुपये १५ कोटी व मौजे गार ते दौंड शहर या पुलास रुपये २५ कोटी मिळावेत अशी मागणीही केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहु पुलांकरीता निधीची तरतूद करून पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) विषयांकित पुलाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण, निकष, व निधी मर्यादा यांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## अहमदनगर बांधकाम विभागाने कोट्यवधीची देयके कार्यकारी अभियंत्याच्या आदेशावरुन अदा केल्याबाबत

**(३७) ३७२० (०२-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्त्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी ठेकेदार व बांधकाम विभागाच्या अधिका-यांव्यतिरिक्त स्वतंत्र अभियंता नियुक्त करून अभियंत्याच्या अहवालानंतरच ठेकेदाराला देयके अदा करावीत असे बंधनकारक असताना अहमदनगर बांधकाम विभागाने कोट्यवधीची देयके केवळ कार्यकारी अभियंत्याच्या आदेशावरुन अदा केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इम्प्रोव्हमेंट ऑफ अमरापुर, पाथर्डी, कडा, मिरजगाव, कर्जत, भिगवन, हायब्रीड अन्युइटी अंतर्गत एनएसके ६८ या रस्त्याचे काम अहमदनगर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, या रस्त्याचे काम सुरू केल्यानंतर स्वतंत्र अभियंता नियुक्त न करताच रस्त्याच्या कामाची कोट्यवधी रुपयांची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वतंत्र अभियंता नियुक्त केला गेला नाही व स्वतंत्र अभियंता निवृत्त झाला नसल्यास सदर विभागाचे कार्यकारी अभियंता स्वतः स्वतंत्र अभियंत्याची स्वाक्षरी करून ठेकेदाराला देयके अदा करू शकतात का,

(५) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत ठेकेदार व अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

स्वतंत्र अभियंता नियुक्तीच्या निविदेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे तसेच, निवडणूक आदर्श आचारसंहितेमुळे स्वतंत्र अभियंता नियुक्तीस विलंब झाल्यामुळे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे आदेशानुसार कार्यकारी अभियंता,रोजगार हमी योजना, (कार्य) विभाग, अहमदनगर यांनी देयके अदा केली आहेत.

(२) सदरचे काम रोजगार हमी योजना (कार्य) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत सुरू आहे.

(३) व (४) कार्यकारी अभियंता, रोजगार हमी योजना (कार्य) विभाग, अहमदनगर यांनी स्वतंत्र अभियंता नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार देयके अदा केली आहेत. सद्यस्थितीत स्वतंत्र अभियंता कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गेवराई (जि.बीड) येथील रा.मा. ५० महारटाकळी-उमापुर ते बागपिंपळगाव रस्ता दुरुस्तीच्या कामाबाबत**

**(३८) ३७६६ (२१-०३-२०२०). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) रा.मा. ५० महारटाकळी-उमापुर ते बागपिंपळगाव रस्ता दुरुस्तीच्या कामाला सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात मंजुरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे टेंडर श्री गणेश कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री गणेश कन्स्ट्रक्शन यांना दिनांक ६ जुन, २०१८ रोजी वा त्यासुमारास सदर कामाचा कार्यारंभ आदेश देऊनही अद्यापपर्यंत प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, बीड यांच्याकडे वेळोवेळी श्री गणेश कन्स्ट्रक्शन यांच्याविरोधात लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्यावरील २ कामांना मंजुरी मिळाली आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) प्रश्नाधीन रस्त्यांच्या कामासंदर्भात मा.लोकप्रतिनिधींची दि.०९ जाने, २०२० रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे. सदरील तक्रारीतील उल्लेखित रस्त्यांच्या कामास सुरवात करण्यात आली होती. तथापि कोव्हिड-१९ लॉकडाऊन मुळे सद्यस्थितीत काम बंद आहे.

(४) होय. हे खरे आहे.

(५) निविदा अटी / शर्तीनुसर कामाची प्रगती न राखल्याबद्दल कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड, रत्नागिरी जिल्हयाला जोडणा-या आंबेत पुलावरील वाहतूक बंद असल्याबाबत**

**(३९) ३७८२ (२०-०३-२०२०). श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड, रत्नागिरी जिल्हयाला जोडणा-या आंबेत पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु असल्याने पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुल वाहतूकीस बंद ठेवण्यात आल्याने परिक्षार्थी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसाय होणार असल्याने वाहतूकीची पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी संबंधित अधिका-यांकडे माहे जानेवारी २०२० च्या दुस-या आठवड्यात वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुल बंद ठेवण्यात येणा-या कालावधीत वाहतूकीस पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

पुलावरील अवजड वाहतुक बंद केली आहे, परंतु कार, जीप, दुचाकी वहाने, ऑटोरिक्षा इ. वाहनांची वाहतुक सद्यस्थितीत चालू आहे.
(२) होय.

परिसरातील नागरीकांनी पर्यायी व्यवस्था करणेबाबत मागणी केली आहे.
(३) आगामी काळात पुलाच्या पेडस्टल दुरुस्ती व बेअरिंग बदलणेसाठी पुलावरील सर्व प्रकारची वाहतुक सुमारे तीन महिन्यासाठी बंद ठेवावी लागणार आहे. या कालावधीत पर्यायी व्यवस्था म्हणुन महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या सहकार्याने जल वाहतुक सेवा सुरु करणे प्रस्तावीत आहे. यासाठी आवश्यक असलेला रु. ७९.०७ लक्ष निधी शासना कडुन मंजुर करणेत आलेला असुन, सदर निधी महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडे वर्ग केलेला आहे. महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडुन जलवाहतुक सेवा सुरु करणेसाठी आवश्यक असलेल्या जेट्टीचे बांधकाम करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. जेट्टीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर जलवाहतुक सेवा सुरु करुनच पुलाचे उर्वरित दुरुस्तीचे काम पुलावरील सर्व प्रकारची वाहतुक बंद केल्यानंतर करण्याचे प्रस्तावीत आहे.
(४) लागू नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) व इंदापूर (जि.पुणे) या दोन तालुक्यांना जोडण्यासाठी पुल बांधण्याबाबत

**(४०) ४०४६ (१६-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) व इंदापूर (जि.पुणे) या दोन तालुक्यांना जोडण्यासाठी सुमारे १२० किलोमीटर अंतराचा वळसा घालावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उजनी धरण निर्मितीमुळे सोलापूर व पुणे जिल्हयातील गावे एकमेकांपासून दुरावली गेल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उजनी धरणाच्या जलाशयावर दोन किलोमीटरचा पूल बांधणेचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उजनी धरणातून विना परवाना लाँचमधून वाहतूक सुरु असून सदर ठिकाणच्या नागरिकांना अनेक सुख सोयींपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन स्तरावर याबाबत कोणती उपाययोजना करण्यात येणार वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१६-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. प्रश्नांकीत कुगांव, ता. करमाळा व कळाशी, ता. इंदापूर या दोन गावांना भीमा नदीने विभाजले आहे. उजणी धरणाच्या निर्मितीनंतर पाण्याच्या फुगवट्यामुळे या दोन तालुक्यातील गावे दुरावली आहेत.
(३) हे खरे नाही. कुगांव, ता. करमाळा व कळाशी, ता.इंदापूर या दोन गावांना जोडणारा रस्ता योजनेत नाही. तसेच सद्य:स्थितीत या दोन गावां दरम्यान २ कि.मी. लांबीचा पुल बांधण्याचा कोणताही प्रस्ताव नाही.
(४) व (५) होय, हे खरे आहे.जलसंपदा विभाग यांच्या अहवालानुसार उजनी जलाशयामध्ये काही ठिकाणी विना परवाना खाजगी लाँच द्वारे वाहतूक सुरु आहे. तथापि संबंधितांना वेळोवेळी नोटीसा दिल्या असून याबाबत स्थानिक पोलीस स्टेशनकडे गुन्हा दाखल करण्याबाबत पत्रव्यवहार जलसंपदा विभागाकडून करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आजरा-पोळगाव-एरंडोळ (ता.आजरा, जि.कोल्हापुर) येथील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या बाजूपट्ट्या क्षतिग्रस्त झाल्याबाबत

**(४१) ४३१४ (१८-०३-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजरा-पोळगाव-एरंडोळ (ता.आजरा, जि.कोल्हापुर) येथील रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या बाजूपट्टया क्षतिग्रस्त झाल्या असुन दुतर्फा धोकादायक असणारी झाडे तोडण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व सदर रस्त्याच्या बाजूपट्टया नव्याने करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१८-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. स्थानिक ग्रामस्थांनी केलेले दि.२१/११/२०१९ रोजीचे निवेदन विभागास प्राप्त झाले आहे.
(२) विषयांकीत रस्त्याच्या लांबीमध्ये द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्याच्या एकुण ११.४५ कि.मी. लांबीतील बाजूपट्टयांचे दुरुस्ती काम पुर्ण झाले आहे. तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या धोकादायक झाडांच्या फांद्या व झुडपांची सफाई करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटबोरी ते मेहकर (जि.बुलढाणा) या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याबाबत**

**(४२) ४६९५ (०२-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटबोरी ते मेहकर हा रस्ता मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील अंजनी बु., आंधुरड, लोणीगवळी, वरुड, घाटबोरी, टेंभूरखेड, वागदेव अशा सात गावांना जोडणारा रस्ता असून या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

घाटबोरी ते मेहकर या रस्त्याच्या एकूण लांबीपैकी ५.०० कि.मी. लांबीवरुन बांधकामासाठी लागणारे गौण खणिज व बांधकाम साहित्याच्या अति जड वाहनांच्या मोठ्या प्रमाणातील वाहतूकीमुळे या लांबीमध्ये रस्ते पृष्ठभाग वारंवार क्षतिग्रस्त होत आहे.

(२) सद्य:स्थितीत डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले असून, रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील अनेक रस्त्यांची झालेली दूरवस्था**

**(४३) ५०३९ (२१-०३-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील हतगड मार्गे दळवट, कनाशी किंवा बोरगांव मार्गे खिराड व भितंबारी या मार्गाने वणीकडे तर वणीकडून सापुताराकडे या मार्गावरुन अवजड वाहने धावत असल्याने या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवजड वाहने सुरगाणा तालुक्यातील उंबरपाडा शिवारात असलेल्या प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा आरटीओ चेकपोस्ट नाका चुकविण्याकरिता गुजरात राज्यातून हतगड मार्गे दळवट, कनाशी किंवा बोरगांव मार्गे खिराड व भितंबारी या मार्गाने वणीकडे तर वणीकडून सापुतारा या मार्गाने जात असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत व अवजड वाहनांवर कारवाई करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१)होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) प्रश्नाधीन रस्त्यावरील लांबीत सन २०१८-१९ मध्ये मजबुतीकरणाची व पुर्न:बांधणीची कामे करण्यात आली असून रस्ता सुस्थितीत आहे. अवघड वाहतुकीमुळे काही ठिकाणी पडलेले खड्डे पावसाळयानंतर संबंधित ठेकेदाराकडून भरुन घेण्यात आले आहेत. अवजड वाहतुकीबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी,नाशिक यांचेमार्फत सीमा तपासणी नाका, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मालेगाव यांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळवण (जि.नाशिक) शहरातील मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) ५०५१ (२१-०३-२०२०). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) कळवण (जि.नाशिक) शहरातील मुख्य रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुख्य रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडलेले असून रस्त्याची दुरुस्ती करण्यात येते परंतु पाऊस पडल्यानंतर मुरुम व खडी टाकलेल्या ठिकाणी पुन्हा खड्डे व चिखल तयार होतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
व तदनुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) तसेच रस्त्याच्या कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन कळवण शहरातून राज्यमार्ग-२२ व राज्यमार्ग-२७ ची लांबी जात असून या लांबीतील खड्डे कंत्राटदारामार्फत भरण्यात आले आहेत व रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.
(४) राज्यमार्ग-२२ वरील रस्ते सुधारणा कामासाठी सन २०१९-२० मध्ये रू. २२.४२ लक्ष इतक्या रकमेची तरतूद उपलब्ध आहे. तसेच राज्यमार्ग-२७ वरील प्रश्नाधीन लांबी हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रमांतर्गत रस्त्याच्या मंजूर कामामध्ये अंतर्भूत असून या रस्त्याच्या कामासाठी सन २०१९ मध्ये रू. ४७.६१ कोटी इतक्या रकमेची तरतूद उपलब्ध आहे व कंत्राटदाराने स्वखर्चाने खड्डे भरण्याचे काम करावयाचे आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नागपूर समृध्दी एक्सप्रेस मार्गाचा शासनाने घेतलेला आढावा**

**(४५) ५१९६ (२१-०३-२०२०). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर समृध्दी एक्सप्रेस महामार्गाच्या प्रस्तावाचा विद्यमान शासनाने दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास आढावा घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाची लांबी किती किलोमीटर आहे,

(३) असल्यास, सदर महामार्गाचा एकूण अंदाजीत खर्च किती कोटी रुपयांचा असणार आहे,

(४) असल्यास, मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाला हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाच्या कामाच्या प्रगतीची सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर महामार्गाची एकूण लांबी ७०१.३६ किमी आहे.

(३) सदर महामार्गाचा एकूण अंदाजीत खर्च रू. ५५३३५.३२ कोटी असणार आहे.

(४) होय. सदर महामार्गास दि.२० डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे हिंदु ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग असे नामाधिकरण करण्यात आले आहे.

(५) सदर काम प्रगतीपथावर असून मे, २०२० अखेर सरासरी २४.४४ टक्के आर्थिक प्रगती साध्य झाली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये रात्रीच्या वेळी रुग्ण संपर्क अधिकारी (पीआरओ) उपस्थित राहत नसल्याबाबत**

**(४६) ५२७६ (१६-०३-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रुग्णांना सवलती देण्यासाठी १० टक्के राखीव खाटा सवलत योजना सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा रुग्णालयांमध्ये रात्रीच्या वेळी गरीब निर्धन रुग्ण दाखल केल्यानंतर पैशांची अडचण आल्यास रात्रीच्या वेळी रुग्ण संपर्क अधिकारी उपस्थित नसल्याने त्यांच्याकडूनच डिपॉझीट भरुन घेतले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णाला डिस्चार्ज सायंकाळी उशिरा व रविवारी देण्याचे प्रमाण जास्त असल्याने रुग्ण संपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क होत नसल्याने बहुतांशी रुग्णांचे बिल माफ होण्याचे प्रमाण कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गरीब रुग्णांवर १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून होणारे उपचाराचे रुग्ण ओळखण्यासाठी खाटांवर वेगळी खूण असावी तसेच रुग्ण रात्रीच्या वेळी आल्यानंतर त्यांच्या सुविधेसाठी रुग्ण संपर्क अधिकारी उपस्थित राहण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२०-०८-२०२०) :** (१) होय.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, ही खरे नाही.
(४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी लागू केलेल्या योजनेनुसार सदर खाटा आरक्षित असलेबाबत स्पष्टपणे नमुद केले आहे. तसेच, प्रत्येक रुग्णालयात रात्री उशीरा व सुट्टीच्या दिवशीही योजनेची अंमजबजावणी करणेबाबत जबाबदार व्यक्तिकडे जबाबदारी दिलेली असते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुळजापुर (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या नविन इमारतीबाबत**

**(४७) ५४४० (२१-०३-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) तुळजापुर (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथील रुग्णांची संख्या पाहता तेथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात केलेले असून सन २०११ मध्ये लाखो रुपये खर्च करुन जुन्या रुग्णालयाजवळच नविन वास्तु उभारण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारती मधील शस्त्रक्रिया विभागाच्या दोन्ही भिंतीस तडे गेलेले आहेत व त्याबाबत तेथील तत्कालीन वैद्यकीय अधिक्षक श्री.धनंजय चाकुरकर यांनी सा.बां. विभागास याबाबत लेखी पत्राद्वारे कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यावर सा.बां. विभागामार्फत केवळ तात्पुरती कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू इमारतीला पावसाळ्यामध्ये गळती लागते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यावे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

याबाबत वैद्यकीय अधीक्षक यांनी लेखी पत्रान्वये कळविले आहे हे खरे आहे. तथापि दोन्ही भिंतीस तडे गेले हे खरे नाही.

(३) खरे नाही.

विभागामार्फत दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) अंशत: खरे आहे.

इमारतीमधील Expansion joint च्या ठिकाणी काही प्रमाणात गळती होते हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी गळती प्रतिबंधक उपाययोजना करुन परिसर स्वच्छतेसह कामे पूर्ण झाली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुरंदर तालुक्यात (जि.पुणे) अतिवृष्टीमुळे क-हा नदीवरील पुल वाहून गेल्याबाबत

**(४८) ५६०२ (२१-०३-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर तालुक्यात (जि.पुणे) माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे क-हा नदीवर असणारे पुल वाहून गेल्यामुळे वाहतूकीची समस्या निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (११-०८-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रश्नांकीत पुरंदर तालुक्यातील क-हा नदी परीसरात दि. २५ सप्टेंबर, २०१९ रोजी अतिवृष्टी व ढगफुटी झाल्यामुळे १.२५ क्युसेक्स ने पाणी कऱ्हा नदीत सोडल्याने जेजुरी नाझरे पिंपरी प्रजिमा ६४ वरील पूल व सटलवाडी पिंगोरी पांडेश्वर प्रजिमा १३४ वरील एक नळकांडी पूल हे वाहून गेले नसून या पुलांच्या पोचमार्गाचे भराव पुर्णपणे वाहून गेले त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुक बंद ठेवण्यात आली आहे.

(२) पूरहानी कार्यक्रमाअंतर्गत सदर पुलाच्या पोचमार्गाचे दुरुस्ती काम मंजूर असून कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण झाली आहे. सद्य:स्थितीत काम प्रगतीत असून जून २०२० पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) येथील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(४९) ५८६५ (२१-०३-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील आर्वी विधानसभा मतदार संघातील रस्त्यांची अती महत्वाची कामे मंजूर करण्याबाबत पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी विधानसभा मतदार संघातील पत्रामध्ये नमूद केलेल्या रस्त्यांची दूरवस्था झाली असून चालणे सुध्दा कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरहू रस्त्यांकरिता निधी उपलब्ध करून देऊन दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०७-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. पत्रात नमूद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असून सद्यस्थितीत या रस्त्यांवरून वाहतूक सुरळितपणे सुरू आहे.

(३) व (४) सदर रस्त्यांची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमाच्या अधीन राहून हाती घेण्यात येतील.

---

## भोर, वेल्हे, मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत आणण्याबाबत

**(५०) ५९९७ (२०-०३-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर, वेल्हे, मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत सुरु करण्याकरिता मा.स्थानिक लोकप्रतिनिधींना मा. महसूल मंत्री यांना दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्रावर निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन सदर तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) भोर व वेल्हे, या दोन तालुक्यात प्रशासकीय इमारत बांधकामास दि.२७.०२.२०२० रोजी दोन स्वतंत्र आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली असून सदर कामांचा चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात समावेशही करण्यात आला आहे.

मुळशी तालुक्यात तहसिलदार कार्यालय इमारत प्रस्तावित असून सदर इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन महसूल विभागाकडे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.